महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :-**

जा.क्र. :तंशिविकापु/शै.वि.-३/२०२३/
दिनांक : २६/०९/२०२३

**प्रति,**
संचालक/प्राचार्य,
शासकीय / अशासकीय अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित
अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, इ.
पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, पुणे विभाग

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम/पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत..**

**संदर्भ :** १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६११ दि. ११.०७.२०२३
२. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६१० दि. ११.०७.२०२३
३. या विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/शै.वि-३/२०२३/२९९१ दि.१२.०७.२०२३
४. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६८३ दि. ०१.०८.२०२३
५. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६८४ दि. ०१.०८.२०२३
६. या विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/शै.वि-३/२०२३/३३९४ दि.०२.०८.२०२३
७. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/७७४ दि.०१.०९.२०२३
८. या विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/शै.वि-३/२०२३/४१८१ दि.०४.०९.२०२३
९. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र.२/एनजीसी/२(३)/वि.सं.ब. /२०२३/८६९ दि.२५.०९.२०२३

उपरोक्त विषयान्वये राज्य सामाईक प्रवेश कक्ष,मुंबई यांनी पुनश्च थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रीयेस दि.२५.०९.२०२३ व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.२१.०९.२०२३ रोजी पर्यंत मुतदवाढ दिलेली आहे. दरम्यान विद्यार्थी, पालक व संबंधित घटकांकडून संस्था बदलासाठी अर्ज करण्याच्या मुदतवाढीबाबत विचारणा होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया समाप्त झाल्यानंतर रिक्त असलेल्या जागांवर विद्यार्थी हिताचा विचार करुन शेवटची संधी म्हणून विद्यार्थी संस्था बदलाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसेच कोणत्याही परिस्थितीत शाखा व संस्था बदल करतेवेळी अधिसंख्य जागांव्यतिरिक्त रिक्त जागा पेक्षा जास्त जागांवर प्रवेश करण्यात येऊ नयेत. तसे आढळल्यास त्या संस्थांवर नियमाप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१. संस्था प्रमुखांनी संस्थेतर्गत विद्यार्थ्यांच्या शाखा बदलाची कार्यवाही दि.३०.०९.२०२३ पर्यत करण्यात यावी. (केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.)

कृ.मा.प.

२. विभागांतर्गत संस्था बदल/ संस्था बदलासह शाखा बदल/विद्यापीठ बदलासह संस्था व शाखा बदलाचे प्रस्ताव दि.०४.१०.२०२३ पर्यंत या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास सादर करावे.

३. आंतरविभागीय संस्था बदलाचा प्रस्ताव या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास दि.०४.१०.२०२३ पर्यंत सादर करावे.

सदर कार्यवाही करतांना संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच संस्था प्रमुखांनी संस्था बदलाच्या वाढीव मुदतीबाबतची माहिती विद्यार्थ्यांना अवगत करण्यात यावे व सदर माहिती संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच दि.०४.१०.२०२३ नंतर तसेच अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र/ कागपत्रांविना सादर केलेले अर्जाबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**Signed by Maruti Rajaram Jadhav**
**Date: 26-09-2023 17:06:45**
**Reason: Approved**

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे